प्रेसनोट दिंनाक – ११/०६/२०१८ खडक पो. स्टे. पुणे

**अंमली पदार्थ विक्री करणारी टोळीप्रमुख आरती मिसाळ ऊर्फ आरती मुकेश चव्हाण ऊर्फ आरती विशाल सातपुते व तिचे साथीदाराविरुध्द मोका नुसार दोषारोपपत्र दाखल**

दिनांक – १५/१२/२०१७ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा पुणे चे पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे व त्यांचे पथकातील कर्मचारी यांनी आरोपी नामे–१) गोपीनाथ नवनाथ मिसाळ वय - २२ रा - इनामके मळा लोहीयानगर पुणे २) हुसैन पापा शेख वय – २८ रा – सांताक्रुझ (पुर्व) मुंबई यांना अंमली पदार्थ बाळगल्या प्रकरणी पकडले होते. त्यानंतर मुख्य आरोपी नामे- ३) आरती महादेव मिसाळ ऊर्फ आरती विशाल सातपुते ऊर्फ आरती मुकेश चव्हाण वय-२७ रा. लोहियानगर,पुणे. ४)पुजा महादेव मिसाळ ऊर्फ पुजा ज्योतिबा तांबवे वय-३२ रा. लोहियानगर,पुणे. ५) निलोफर हयात शेख वय-२७ रा. हरकानगर,पुणे. ६) अजहर ऊर्फ चुहा हयात शेख वय- २४ रा. हरकानगर,पुणे. ७) रॉकिसिंग जालिंदरसिंग कल्याणी वय- २३ रा -रामटेकडी हडपसर पुणे यांना दिनांक – ०७/०१/२०१८ पकडण्यात आले आहे. त्यांचेकडे तपास करुन त्यांचे ताब्यातुन सर्व मिळुन **एकुण शंभर ग्रॅम ब्राऊन शुगर (हेरॉईन) व दोन किलो पन्नास ग्रॅम चरस अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आलेला आहे.** त्याशिवाय त्यांचे ताब्यातुन रोख रक्कम, सोन्याचे दागिने, एक स्वीप्ट कार, एक ॲक्टिव्हा मोपेड, मोबाईल फोन असा एकुण बारा लाख तीस हजार रुपयाचा इतर माल हस्तगत करण्यात आलेला आहे. आयशा ऊर्फ आशाबाई पापा शेख व जुलैखाबी पापा शेख ऊर्फ जुलैखाबी महमद कुरेशी ऊर्फ जिल्लो दोघी रा - मुंबई यांचेकडुन आरोपी अंमली पदार्थ खरेदी करत होते असे उघडकीस आलेले आहे त्या दोघीही फरार आहेत त्यांचा शोध चालु आहे.

टोळी प्रमुख आरती महादेव मिसाळ वय – २७ वर्षे रा - इनामके मळा, लोहियानगर, पुणे ही इतर आरोपीचे मदतीने संगणमत करुन संघटितरित्या अंमली पदार्थाची करत होती. तिने सदर व्यवसायातुन मिळालेल्या उत्पन्नामधुन सुमारे चाळीस लाख रुपये किंमतीची मालमत्ता त्यामध्ये दोन ठिकाणी घरे खरेदी केली आहे व मॅजिस्टीक सोसायटी वाघोली व की स्टोन सोसायटी उंड्री या उच्चभ्रु सोसायटीत प्लॅट खरेदी बाबत व्यवहार केलेले आहेत. तसेच तिने अंदाजे आठ लाख रुपये किंमतीच सोन्याचे दागिने खरेदी केल्याबाबत तसेच तिचे बँकेत लॉकर असल्याची माहीती पोलीसांना मिळालेली आहे. त्याबाबत तपास चालु आहे,

टोळीप्रमुख आरती मिसाळ हिचेविरुध्द यापुर्वी खडक व पिंपरी पोलीस स्टेशन पुणे येथे ब्राऊन शुगर (हेरॉईन) व दारु विक्रीचे चार गुन्हे, पुजा मिसाळ हिचेविरुध्द पिंपरी पोलीस स्टेशन पुणे येथे ब्राऊन शुगर (हेरॉईन) विक्रीचा एक गुन्हा, अजहर ऊर्फ चुहा हयात शेख यांचेवर खडक पोलीस स्टेशन येथे घरफोडी व मारामारीचे गुन्हे असून त्याला सन-२०१४ साली १ वर्षा करिता तडीपार करण्यात आले होते. आरोपी नामे निलोफर हयात शेख ही सदर व्यवसायातुन मिळालेले पैस बेकायदेशीर सावकारी व्यवसायामध्ये गुतवंत होती. त्याबाबत तिचे विरुध्द खडक पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा दाखल आहे. रॉकीसिंग कल्याणी हा सराईत गुन्हेगार आहे त्याचेविरुध्द वानवडी पोलीस स्टेशन पुणे येथे खुनाचा प्रयत्न व दंगा मारामारीचे दोन गुन्हे दाखल आहे. त्याचेवर वेळोवेळी योग्य प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.

टोळी प्रमुख आरती मुकेश चव्हाण ऊर्फ आरती विशाल सातपुते ऊर्फ आरती महादेव मिसाळ, रा. इनामके मळा, लोहीयानगर पुणे व तिचे साथीदार यांनी संघटीत रित्या तसेच वैयक्तीक रित्या टोळीचे अवैध आर्थिक प्राप्तीसाठी आपली टोळी तयार करुन संघटीतरित्या गुन्हे केल्याचे आढळुन आल्याने त्यांचेविरुध्द मोका कायदा अंतर्गत कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव मा. रविंद्र सेनगावकर अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर यांचेकडे सादर करण्यात आलेला होता. त्यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३ (१) (११), ३ (४) प्रमाणे कारवाई करण्याचे आदेश होते.

टोळी प्रमुख आरती मिसाळ हिने संघटीतरित्या गुन्हेगारांची टोळी करुन त्यासर्वांनी मिळुन संघटीतपणे तर कधी एकटयाने मागील दहा वर्षाच्या कालावधीत पुणे शहरातील लोहीयानगर, कासेवाडी, हरकानगर, वानवडी, रामटेकडी या परिसरात मोठया प्रमाणात ब्राऊन शुगर, चरस व इतर अंमली पदार्थाची अवैध विक्री करुन त्यापासुन मिळणारे अवैध अर्थिक नफयातुन टोळीप्रमुख आरती मिसाळ हिने स्वतः व टोळीतील सदस्य यांनी जंगम व स्थावर मालमत्ता खरेदीचे व्यवहार केल्याचे उघडकीस आले आहे. **मा. अपर पोलीस महासंचालक तथा पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम २३ (२) अन्वये मा. विशेष न्यायालय यांनी दखल घेण्याबाबत मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार दिनांक – ११/०६/२०१८ रोजी मा. एस. एच. ग्वालानी जिल्हा न्यायाधिश व अपर सत्र न्यायाधिश पुणे शहर यांचे न्यायालयात सर्व आरोपीविरुध्द एनडीपीएस ॲक्ट ८ (क), २०(ब) (११) (क), २१ (ब), २९ महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३ (१) (११), ३ (४) , ३ (५) अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.**

मा. रविंद्र सेनगावकर अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे व डॉ. बसवराज तेली पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनेनुसार खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र मोकाशी व श्री संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक (गुन्हे) व पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, आनंत व्यवहारे व पोलीस कर्मचारी अनिकेत बाबर, राहुल जोशी, महेश बारवकर, महेश कांबळे यांनी सदर कारवाई केली आहे. सदर गुन्हयाचा तपास शहर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्री. किशोर नाईक हे करत आहेत.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडक पोलीस स्टेशन पुणे